कुलाबा - वांद्रे - सीप्झ या पहिल्यावहिल्या मुंबई मेट्रो - ३ चा भुयारी प्रकल्प

# मुंबईच्या पोटातले भुयार आले मेरिटमध्ये; ९७ टक्के प्रगती!


**सचिन लुंगसे**

लोकमत न्यूज नेटवर्क


**मुंबई :** मुंबईच्या पोटात वेगाने भुयार खणणाऱ्या कुलाबा - वांद्रे - सीप्झ या पहिल्या वहिल्या मुंबई मेट्रो - ३च्या भुयारी मार्ग प्रकल्पाचे एकंदरित काम ७१.५० टक्के पूर्ण झाली आहेत.

शिवाय स्थापत्य कामे ८२ टक्के पूर्ण झाली असून, प्रणालीविषयक कामे ३४ टक्के पूर्ण झाली आहेत, तर स्थानकांची कामे ७९ टक्के झाली असून, प्रकल्पाचे एकूण ९७ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे.

प्रकल्पाचे एकूण ९७ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे. भुयारीकरणाचे उर्वरित काम पॅकेज - ३ अंतर्गत महालक्ष्मी ते मुंबई सेंट्रल दरम्यान २ किलो मीटर अंतर सुरू आहे. आतापर्यंत मेट्रो - ३च्या स्थानकांच्या बांधणीचे जवळपास ७९ टक्के काम पूर्ण झाले आहे.








## दहा स्थानकांचे बांधकाम आटोक्यात

एम. आय. डी. सी, सीप्झ, विधान भवन, मरोळ नाका, कफ परेड, सिद्धिविनायक, चर्चगेट, हुतात्मा चौक, मुंबई सेंट्रल आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ या स्थानकांचे ८० टक्क्यांहून अधिक बांधकाम पूर्ण झाले

## भारतात प्रथमच

मेट्रो - ३ रुळांमध्ये कंपने रोखणारी हाय अटेंशन लो व्हायब्रेशन या अद्ययावत प्रणालीचा वापर होत आहे. भारतात प्रथमतः या प्रणालीचा वापर होत असून, ध्वनी व कंपनांसंबंधी समस्यांसंदर्भात अमेरिकन स्टँडर्डप्रमाणे हे तंत्रज्ञान उपयोगात येणार आहे.

## १०० % बांधकाम पूर्ण

एकूण ९ स्थानकांचे तिन्ही स्लॅबचे बेस स्लॅब, काँकोर्स स्लॅब आणि रुफ स्लॅब १०० टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे.